Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### दि. १९/०५/२०२३ रोजीच्या अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्र (Center for Internal Quality Assurance (CIQA) समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातंर्गत गुणवत्ता हमी केंद्रासाठी (Center for Internal Quality Assurance (CIQA) गठीत करण्यात आलेल्या समितीची बैठक शुक्रवार दि. १९/०५/२०२३ रोजी दु. १२.०० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के, मा. कुलगुरूसो | अध्यक्ष |
| २ | प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन,मा.अधिष्ठाता,वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ३ | प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार, विभागप्रमुख, गणित अधिविभाग | सदस्य |
| ४ | डॉ. (श्रीमती.) संजीवनी महाले, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | सदस्य |
| ५ | डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र | सदस्य |
| ६ | डॉ. यु. के. सकट, सहाय्यक कुलसचिव, वित्त व लेखा विभाग | सदस्य |
| ७ | प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख, संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्र | सदस्य—सचिव |
| ८ | डॉ. डी. के. मोरे, संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र | |

सदर बैठकीच्या सुरूवातीस प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्तविक केले आणि उपस्थित मा. अध्यक्ष व सदस्यांचे स्वागत केले. डॉ. डी. के. मोरे, संचालक यांनी सर्व उपस्थितांचे विद्यापीठाच्या प्रचलित प्रथेनुसार ग्रंथ देऊन स्वागत केले. बैठकीच्या सुरूवातीला मा. कुलगुरू यांनी CIQA च्या येथून पुढे नियमितपणे बैठका घ्याव्यात तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार कामकाज करावे जेणेकरून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमांचे पालन होईल तसेच CIQA चे वार्षिक अहवाल (Annual Report) विविध अधिकार मंडळाच्या बैठकीपुढे येथुन पुढे ठेवण्यात यावेत असे सांगितले आणि विषयपत्रिकेनुसार खालीलप्रमाणे कामकाज सुरू करण्यात आले.

विषय क्र १. मागील बैठकीचा इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

**ठराव** मागील बैठकीचा इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.

विषय क्र २. प्रस्तावित ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या सद्यस्थितीचा आढावा.

**ठराव** प्रस्तावित ऑनलाईन अभ्यासक्रमाच्या संदर्भात सादर केलेला सद्यस्थितीचा आढावा मान्य करण्यात आला. सदरचा अभ्यासक्रम नवीन शासन निर्णयानुसार आहे का? याची खातरजमा करून घ्यावी.

विषय क्र ३. प्रस्तावित ऑनलाईन प्रोग्रॅमअंतर्गत मूल्यमापन प्रक्रियेची मार्गदर्शक तत्वे निश्चित करणेची बाब विचारार्थ.

**ठराव** प्रस्तावित ऑनलाईन प्रोग्रॅम अंतर्गत मूल्यमापन प्रक्रियेची तयार करण्यात आलेली मार्गदर्शक तत्वे मान्य करण्यात आली तसेच पेपर तपासणीसाठी अधिकची शिक्षकाची नावे अधिकार मंडळाकडून मान्य करून घ्यावीत.

विषय क्र ४. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत प्रस्तावित एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) व एम. बी. ए. या चार ऑनलाईन अभ्यासक्रमाचे Programme Project Report (PPR) मान्यतेसाठी.

**ठराव** दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत प्रस्तावित एम. कॉम., एम.एस्सी. (गणित), एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) व एम. बी. ए. या चार ऑनलाईन अभ्यासक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या Programme Project Report (PPR) मान्य करण्यात आले.

विषय क्र ५. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२—२३ पासून सुरू असलेल्या ODL Programme चे Programme Project Report (PPR) मान्यतेसाठी.

**ठराव** दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२—२३ पासून सुरू असलेल्या ODL Programme चे Programme Project Report (PPR) मान्य करण्यात आले.

विषय क्र ६. ODL एम. बी. ए. प्रोग्रामचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे Category-1 अंतर्गत सादर केलेली बाब माहितीसाठी.

**ठराव** एम. बी. ए. (ODL) प्रोग्रामचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे Category-1 अंतर्गत सादर करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, UGC DEB व AICTE सारख्या शिखर संस्थांशी वेगवेगळया कामाच्या अनुषंगाने पूर्तता करवून घेण्याची जबाबदारी एका शिक्षकाकडे सोपवावी.

विषय क्र ७. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत सुरू असलेल्या ODL Programme अंतर्गत नवीन अभ्यासक्रमानुसार विविध अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने येणा—या अडचणी व उपाययोजनाची बाब विचारार्थ.

**ठराव** दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत सुरू असलेल्या ODL Programme अंतर्गत नवीन अभ्यासक्रमानुसार विविध अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने आलेल्या अडचणीचा सांगोपांग विचार करण्यात आला. तसेच याबाबत UGC DEB कडून यासंदर्भात काही मार्गदर्शक सूचना येईपर्यत याची वाट पहावी.

विषय क्र ८. स्वयंअध्ययन साहित्याच्या मुखपृष्ठ रचनेची बाब विचारार्थ.

**ठराव** स्वयंअध्ययन साहित्याच्या मुखपृष्ठाची सध्या असलेली प्रचलित पध्दत पुढे सुरू ठेवण्यात यावी.

विषय क्र ९ दुहेरी पदवी (Dual Degree) बाब विचारार्थ.

**ठराव** शैक्षणिक वर्ष २०२२ — २३ करिता दुहेरी पदवी साठी विविध अभ्यासक्रमनिहाय नोंदणी झालेल्या विद्यार्थी संख्येची नोंद घेण्यात आली. तसेच या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणेसाठी सविस्तर चर्चा करण्यात आली. दोन अभ्यासक्रमाच्या परीक्षा एकाचवेळी आयोजन करण्यात येवू नये या अनुषंगाने परीक्षा विभागाशी संपर्क साधावा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास अडचण येवू नये त्या पध्दतीने परीक्षेचे आयोजन करण्यात यावे. असे परीक्षा विभागास कळवावे. ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजन करताना Clash निर्माण होतात तेथील विद्यार्थ्यांच्या फेरपरीक्षा घेता येईल का? यासंदर्भात नियोजन करण्याविषयी परीक्षा विभागास कळवावे तसेच प्रश्नपत्रिका तयार करणे व पेपर तपासणीसाठी पॅनेल तयार करावीत.

विषय क्र १० मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळचे विषय

विषय अ शैक्षणिक वर्ष २०२२ — २३ व २०२३ — २४ चे Academic Calender मान्यतेची बाब विचारार्थ.

**ठराव** शैक्षणिक वर्ष २०२२ — २३ व २०२३ — २४ चे Academic Calender खालील घटनाचा/कार्यक्रमाची नोंद करून दुरूस्तीसह मान्य करण्यात आले.

अ) विद्यार्थीकेंद्रीत कार्यक्रमांचा ठळकपणे Academic Calender मध्ये समावेश करावा.

ब) NET/SET मार्गदर्शन कार्यक्रमाचे नियोजन करावे.

क) E-content workshop आयोजित केलेल्या बाबींची नोंद घेण्यात यावी.

ड) विविध संकल्पनावर आधारित सेमिनार, कॉन्फरन्स, सिम्फोसिझम व वर्कशॉप आयोजित करण्यात यावेत.

विषय ब शैक्षणिक वर्ष २०२२— २३ मध्ये तयार करण्यात आलेल्या स्वयंअध्ययन साहित्याची त्रयस्थ व्यक्तीमार्फत परीक्षण करून घेण्याची बाब विचारार्थ.

**ठराव** शैक्षणिक वर्ष २०२२— २३ मध्ये तयार करण्यात आलेल्या स्वयंअध्ययन साहित्याचे डॉ. श्रीमती. संजीवनी महाले व त्यांनी केलेले नामनिर्देशित तज्ञांकडून त्रयस्थ तज्ञ परीक्षक म्हणून परीक्षण करून घेण्यात यावे.

बैठकीच्या शेवटी मा. कुलगुरू यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये आजीवन व निरंतर विभागातर्फे चालविण्यात जाणाऱ्या अभ्यासक्रमापैकी काही अभ्यासक्रमाचे आयोजन त्या विभागाशी संपर्क साधून करण्यात यावे तसेच विद्यार्थ्यांना शॉर्टटर्म कोर्सेस उदा. जीएसटी, आय. टी. वर आधारित ३ ते ४ दिवसाचे ट्रेनिंग देण्यात यावे. असे सांगितले.

डॉ. के. बी. पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

प्रा. डॉ. एम. एस. देशमुख,
संचालक, अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्र, (CIQA)
सदस्य सचिव

प्रा. डॉ. डी. टी. शिर्के
मा. कुलगुरू
अध्यक्ष